जावक क्र. :-
प्राचार्य
कृष्णा आयुर्विज्ञान संस्था
अभिमत विद्यापीठ, कऱ्हाड.
दिनांक :-

प्रति,

.............................................

.............................................

.............................................

विषय :- मरणोत्तर शवविच्छेदनासाठी शरीरदान.

संदर्भ :-

महोदय,

मरणोत्तर शवविच्छेदनासाठी आपले शरीर दान करण्यासंबंधी आपण इच्छा व्यक्त केलीत हा आपल्या मनाचा मोठेपणा आहे. वैद्यकीय शास्त्राच्या प्रगतीसाठी आपण व्यक्त केलेली इच्छा खरोखर कौतुकास्पद आहे.

कृपया या संदर्भात मृत्यूपूर्वी खालील बाबींची पूर्तता करणे आवश्यक आहे.

१) मृत्यूनंतर माझे शरीर माझ्या इच्छेनुसार कृष्णा आयुर्विज्ञान संस्था, कऱ्हाड यांच्या ताब्यात देण्यात यावे असा स्पष्ट निर्देश असलेले इच्छापत्र आपणांस करावे लागेल.

२) विच्छेदनासाठी शव सुरक्षित ठेवण्यासाठी मृत्यूनंतर सहा तासांच्या आत शव शरीररचनाशास्त्र विभागांत पोच करणे अत्यावश्यक आहे, तरी मरणोत्तर शवदानाकरिता नातेवाईकांनी कृपया शरीररचनाशास्त्र विभाग - कृष्णा आयुर्विज्ञान संस्था, अभिमत विद्यापीठ, कऱ्हाड येथे त्वरित संपर्क साधावा. मृत व्यक्तिचे शव विच्छेदनासाठी दान करतेवेळी, आपण केलेले इच्छापत्र किंवा आपल्या जवळच्या नातेवाईकांचे तसे निवेदन व त्याबरोबर डेथ सर्टिफिकेट अथवा नगरपालिका/महानगरपालिकेचा पास(संमतीपत्र वा डिस्पोझल परमिशन) त्याबरोबर सादर करावे.

३) यासोबत जोडलेला अर्ज (इच्छापत्र) आपण कृपया भरून पाठवावा म्हणजे आमच्या नोंदवहीमध्ये आपल्या नांवाची नोंद केली जाईल व तसे आपणांला कळविण्यात येईल व आपले शरीर वैद्यकीय महाविद्यालयातील विद्याभ्यास व संशोधन कार्यासाठी उपयोगी पडेल.

वरील माहितीनुसार आपणांस आपले शरीर दान करण्याच्या इच्छेची पूर्तता करता येईल अशी आशा आहे. तसेच अधिक माहितीसाठी किंवा काही अडचण आल्यास आपण खाली नमूद केलेल्या विभागाशी संपर्क साधावा.

प्राध्यापक व विभागप्रमुख
शरीर रचनाशास्त्र विभाग
कृष्णा आयुर्विज्ञान संस्था,
अभिमत विद्यापीठ, कऱ्हाड - ४१५ ११०.
दूरध्वनी : (०२१६४) २४१५५५, २४१५५८

प्राचार्य
कृष्णा आयुर्विज्ञान संस्था
अभिमत विद्यापीठ, कऱ्हाड.

# मरणोत्तर देहदान करण्यासंबंधीचे इच्छापत्र

प्रति,
माझे सर्व कायदेशीर बारस
आणि माझ्या मृत्यूच्यावेळी हजर असलेले
आप्तस्वकीय व मित्रपरिवार

मी श्री. / श्रीमती ______________________________
______________ राज्यातील रहिवासी, राहणार ______________________________
______________________________________________

असे इच्छापत्र लिहून देतो की, माझ्या मृत्यूनंतर माझा मृतदेह
मा. प्राचार्य - कृष्णा आयुर्विज्ञान संस्था, अभिमत विद्यापीठ, कऱ्हाड - ४१५ ११०.
द्वारा : कृष्णा चॅरिटेबल ट्रस्ट, कऱ्हाड - ४१५ ११०. यांचेकडे हस्तांतरित करण्यात यावा अशी माझी इच्छा आहे.

मृत्यूनंतर माझ्या मृतदेहाचा संशोधन / विच्छेदन वा इतर आवश्यक असलेल्या कोणत्याही हेतूसाठी त्याचा उपयोग करण्यास माझी हरकत नाही.

वरीलप्रमाणे इच्छापत्र लिहून दिल्याचा दिनांक महिना वर्ष

जन्मदिनांक :-

इच्छापत्र लिहून देणाराची सही

सदर इच्छापत्र आमच्या उपस्थितीत लिहून देण्यात आले आहे.

१) नांव ______________________________
पत्ता ______________________________ नातेवाईक सही
______________________________

२) नांव ______________________________
पत्ता ______________________________ नातेवाईक सही
______________________________

३) नांव ______________________________
पत्ता ______________________________ नातेवाईक सही
______________________________

४) नांव ______________________________
पत्ता ______________________________ मित्र सही
______________________________